आणिबाणी कालीन राजादिष्ट अधिकारी आणि लघुसेवा राजादिष्ट अधिकारी यांच्या नागरी सेवेतील बीनराखीव पदावरील नेमणूकी-नंतरची वेतन निश्चिती...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्रमांक : आरटीए-१०८६/३१७५/प्र.क्र-२१९/९१/२८
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २ जून, १९९२.

वाचा :- १) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरटीए-१०७४/३१३०/सोळा-अ, दिनांक १६ नोव्हेंबर, १९७४.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरटीए-१०७५/२७/सोळा-अ, दिनांक ४ ऑक्टोबर, १९७६.

निर्णय :- केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या कार्मिक व प्रशासनीय सुधारणा विभागाच्या दिनांक २९ नोव्हेंबर, १९८४ च्या व दिनांक ३१ ऑक्टोबर, १९८५ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये अराखीव पदावर नियुक्ती करण्यात आलेल्या आणिबाणी कालीन राजादिष्ट अधिकारी व लघुसेवा राजादिष्ट अधिकारी यांच्या नागरी सेवेतील नियुक्तीच्या पदावरील वेतननिश्चिती बाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्या आदेशांच्या आधारे जे आणिबाणी कालीन राजादिष्ट व लघुसेवा राजादिष्ट अधिकारी राजादिष्ट प्रशिक्षणापूर्वी सैन्यात रूजू झाले आहेत किंवा दिनांक १० जानेवारी, १९६८ नंतर सैन्यात रूजू झाले आहेत व सैन्यातून सेवामुक्त झाल्यानंतर ज्यांची नागरी सेवेत बीनराखीव पदावर नियुक्ती झाली आहे अशा अधिकाऱ्यांना त्यांच्या सैन्यातील सेवेचा लाभ नागरी सेवेतील त्यांच्या वेतननिश्चितीसाठी पुढील अटींवर देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

१) अशा व्यक्तींना सैन्यातील सेवेचा प्रत्येक पूर्ण वर्षाच्या सेवेसाठी एक वेतनवाढ मंजूर करण्यात यावी व त्याआधारे त्यांचे वेतन त्यांच्या नागरी सेवेतील प्रवेशाच्या दिनांकाला पुनर्निश्चित करण्यात यावे.

२) वरील प्रमाणे वेतननिश्चिती झाल्यानंतरची थकबाकी मात्र दिनांक १ नोव्हेंबर, १९८४ नंतरच्या कालावधीसाठी अनुज्ञेय असेल.

३) उपरोक्त वेतननिश्चिती करताना वेतनवाढ दिल्यानंतरचे त्या व्यक्तीचे मूळ वेतन त्यांच्या सैन्यातून निवृत्त होतांना असलेल्या मूळ वेतनापेक्षा अधिक होता कामा नये.

४) आणिबाणी कालीन राजादिष्ट अधिकारी व लघुसेवा राजादिष्ट अधिकारी जे आणिबाणी काळात सशस्त्र दलामध्ये होते व आणिबाणी काळानंतर काही वर्षांच्या सेवेनंतर सैन्यातून निवृत्त झाले त्यांची सैन्यातील एकूण सेवा राजादिष्ट सेवा समजण्यात यावी.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक-३४९/९३/सेवा-४, दिनांक २८ नोव्हेंबर, १९९१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

स्वाक्षरीत
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्वमंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व उपमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई
प्रबंधक लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ / x सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,

[illegible]